


सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

●वर्ष २४ वे ● अंक २४८ ● बुधवार दि.१ जुलै २०२६ ● नांदेड ● पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ ● पाने ४ ● किंमत १ रु.

# खा.श्रीकांत शिंदे यांना काळे झेंडे दाखवून ताफा अडविण्याचा ठाकरे सेनेचा प्रयत्न



माहूर/प्रतिनिधी-शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शिवसैनिकांनी आज (बुधवार) दुपारी माहूर तालुक्यात रस्त्यावर उतरले. अंजनखेड गावाजवळ शिवसेना (शिंदे गट) नेते खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवत जोरदार घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला. सहा बंडखोर खासदारांच्या निषेधार्थ करण्यात आलेल्या या आंदोलनामुळे काही काळ परिसरात राजकीय वातावरण चांगलेच तापले.

डॉ. श्रीकांत शिंदे हे नांदेड विमानतळावरून माहूर मार्गे सारखणी येथे एका कार्यक्रमासाठी जात असताना उद्धव ठाकरे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रस्त्यावर जमले. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास अंजनखेड गावाजवळ गद्दारांचा निषेध असो आणि पक्षाच्या समर्थनार्थ घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाला. परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला. आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांनी हस्तक्षेप करत अनेक शिवसैनिकांना ताब्यात घेतले. त्यानंतर कडेकोट पोलीस बंदोबस्तात डॉ. श्रीकांत शिंदे यांचा ताफा पुढील कार्यक्रमासाठी रवाना करण्यात आला. या आंदोलनामुळे माहूर तालुक्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा ढवळून निघाले असून दोन्ही गटांतील संघर्ष अधिक तीव्र झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

## ज्योतिबा खराटे नजरकैदेत



शिवसेना नेते तथा खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सारखणी दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांकडून काळे झेंडे दाखवून निषेध आंदोलन करण्यात आले. पोलीसांनी अनेक शिवसैनिकांची धरपकड केली तसेच काही जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांना त्यांच्या अंजनखेड येथील निवासस्थानावरून ताब्यात घेऊन सिंदखेड पोलीस ठाण्यात नेण्यात आले.

बंडखोर खा.नागेश पाटील आष्टीकर यांचा निषेध करण्यासाठी उबाठा सेनेकडून आंदोलन करण्यात येणार असल्याची पान ४ वर

# देहविक्रीला तयार असतील तर गिऱ्हाईक मिळणारच!

## पक्षफोडीवर राज ठाकरेंची शेलक्या भाषेत टीका

ठाणे: देहविक्रीला तयारच असतील तर गिऱ्हाईक आहेतच, अशा शब्दांत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पक्ष फोडाफोडीवर शेलक्या भाषेत टीका करीत त्यांनी पक्षांतर करणाऱ्या नेत्यांवर निशाणा साधला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षफोडीच्या राजकारणावर भाजपवर जोरदार टीका केली. ठाण्यातील सीकेपी सभागृहात आयोजित एसआयआर मार्गदर्शन शिबिरानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना, प्रश्न विकत घेणाऱ्याचा नाही, तर विकले जाणाऱ्याचा आहे. महाराष्ट्र आणि देशात फोडाफोडीचे घाणेरडे



राजकारण सुरू असून त्याचे परिणाम भविष्यात भाजपलाच भोगावे लागतील, असा दावा त्यांनी केला. महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालमधील पक्षफोडीमागे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा असल्याचा आरोपही त्यांनी केला. भाजपमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच मुख्य आधार असून, पत्त्यांचा बंगला जसा खालचा पत्ता काढल्यावर कोसळतो, तशीच भाजपची स्थिती आहे, अशी टीकाही त्यांनी केली.एसआयआर प्रक्रियेबाबत मतदार यादी अद्ययावत ठेवणे आवश्यक असल्याचे सांगताना, शहरी नियोजनाकडे दुर्लक्ष होत असून बिल्डरकेंद्रित विकासाला प्राधान्य दिले जात असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. सत्ता कायमस्वरूपी कोणाचीच नसते. सत्ताधाऱ्यांनी लोकशाही परंपरा जपल्या पाहिजेत, असेही राज ठाकरे म्हणाले.

# विधानपरिषद उपसभापतीपदी सचिन अहिर बिनविरोध

मुंबई/प्रतिनिधी- ठाकरेंच्या शिवसेनेतून कालच शिवसेना शिंदे गटात गेलेले आ.सचिन अहिर यांची विधानपरिषदेच्या उपसभापतीपदी बुधवारी बिनविरोध निवड झाली. महाविकास आघाडीचे उमेदवार ज.मो. अभ्यंकर यांची उमेदवारी मागे घेतल्याने अहिर यांची सर्वानुमते निवड निश्चित झाली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन करत त्यांच्या राजकीय कारकिर्दीचे कौतुक केले.



विधानपरिषद उपसभापती निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या कालच्या शेवटच्या दिवशी अचानक शिवसेना ठाकरे गटाचे आ.सचिन अहिर यांनी शिवसेना शिंदे गटाकडून उपसभापतीपदासाठी अर्ज दाखल केल्यानंतर अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला होता. आज विधानपरिषदेत भाजपकडून प्रवीण दरेकर यांनी सचिन अहिर यांच्या बिनविरोध निवडीचा प्रस्ताव मांडला. धैर्यशील कदम यांनी त्यास अनुमोदन दिले. शिवसेनेकडून मनीषा कायंदे यांनी प्रस्ताव मांडला, तर रविंद्र फाटक यांनी अनुमोदन दिले. राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजय खोडके यांनीही महाविकास आघाडीचा प्रस्ताव मागे घेत सचिन अहिर यांच्या निवडीस पाठिंबा जाहीर केला. विक्रम काळे यांनी त्यास अनुमोदन दिल्यानंतर सभागृहाने बहुमताने प्रस्ताव मंजूर करत अहिर यांची उपसभापतीपदी निवड घोषित केली.यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सचिन अहिर यांच्या राजकीय प्रवासाचा गौरव करत, अहिर या शब्दाचा अर्थ गोपालक आणि निर्भीड असा आहे. असे सांगितले. यावेळी फडणवीस यांनी माजी उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या कार्याचाही गौरव केला. उपसभापतीपदाच्या खुर्चीत बसल्यानंतर सर्वांना समान न्याय द्यावा लागतो. सचिन अहिर ही जबाबदारी समर्थपणे पार पाडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही आपल्या खास शैलीत सचिन अहिर यांचे स्वागत केले. पान ४ वर

## सराफा व्यापाऱ्याजवळील तीन किलोचे चांदीचे दागिने लंपास

नांदेड/प्रतिनिधी-सराफा व्यापाऱ्यास धाक दाखवून त्याच्या जवळील तीन किलो चांदीचे दागिने असलेली बॅग लुटून नेल्याची घटना सोमवारी रात्री शिवम बार जवळ घडली आहे.

विजयसिंह खेतसिंह राजपूत (वय २८), धंदा व्यापार, रा. सराफा,नांदेड यांना सोमवारी रात्री सव्वा आठच्या सुमारास निळा रोडवरील शिवम बार जवळ दुचाकीवर आलेल्या तीन चोरट्यांनी अडविले. राजपूत यांना धाक दाखवून वाहनातील तीन किलो चांदीचे दागिने असलेली बॅग काढून घेवून आरोपी पळून गेले आहेत. सदरील चांदीचे दागिने ६ लाख ८१ हजार रुपये किंमतीचे होते. याप्रकरणी विजयसिंह राजपूत यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन लिंबगाव पोलीस ठाण्यात अज्ञात तीन आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास फौजदार सय्यद हे करीत आहेत.



कृषी दिन व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे शिल्पकार मा. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेज परिसरात नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे कर्मचारी व विविध संघटनांचे मान्यवर उपस्थित होते.

## सिडकोमध्ये महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण

नांदेड/प्रतिनिधी-सिडको येथील महावितरणच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याची घटना मंगळवारी सायंकाळी घडली आहे.

महावितरणचे कर्मचारी संतोष शिंदे व त्यांचे सहकारी सोमवारी सायंकाळी कार्यालयात असतांना विजय शंकर गोगदरे रा.शाहूनगर,नांदेड हा इसम कार्यालयात आला. एवढा वेळ वीज कशी काय गेली असा प्रश्न करुन शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. संतोष शिंदे यांच्या जवळील शासकीय मोबाईल काढून घेवून गोंधळ घातला. शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांना मारहाण करुन दहशत निर्माण केली. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केला. संतोष शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात विजय गोगदरे याच्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हिंमत असेल तर रोखून दाखवा

## खा.आष्टीकर यांचा ठाकरे सेनेला थेट इशारा



माहूर/प्रतिनिधी-पुढच्या आठवड्यात किनवट-माहूर तालुका पिंजून काढणार आहे. हिंमत असेल तर रोखून दाखवा, असा थेट इशारा नव्यानेच शिंदे सेनेत गेलेले खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी ठाकरे गटाला दिला आहे.

हिंगोली लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक गावाचा विकास, सर्वसामान्यांची कामे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावरील विश्वास यामुळे आपण शिंदे सेनेत प्रवेश केल्याचे खा.आष्टीकर यांनी सांगितले. सारखणी येथे आयोजित कार्यक्रमासाठी माहूरमार्गे जात असताना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवून निषेध करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर संतप्त प्रतिक्रिया देताना खा.नागेश पाटील आष्टीकर म्हणाले, पुढच्या आठवड्यात संपूर्ण माहूर-किनवट तालुका पिंजून काढणार आहे. हिंमत असेल तर रोखून दाखवा. मग तुम्ही काय आणि आम्ही काय, हे जनतेला दिसेल. यावेळी कोण किती पाण्यात आहे, मला सगळं माहिती आहे, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर अप्रत्यक्ष निशाणा साधला. त्यांच्या या विधानामुळे माहूर-किनवटच्या राजकारणात नव्या संघर्षाची चिन्हे दिसू लागली असून, पुढील आठवड्यातील दौऱ्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. खा.नागेश पाटील आष्टीकर या आक्रमक भूमिकेमुळे परिसरातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, काळे झेंडे दाखविण्याच्या घटनेबाबत संबंधित पक्षाची भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## महावितरणच्या ढिसाळ कारभाराविरोधात बहाद्दरपुरा ग्रामस्थांचे आमरण उपोषण

कंधार/प्रतिनिधी- महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, ग्रामीण भागातील लोडशेडिंग आणि विविध प्रलंबित समस्यांबाबत संतप्त झालेल्या बहाद्दरपुरा (ता. कंधार) येथील ग्रामस्थांनी बुधवारी (दि. १ जुलै) कंधार उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले.




बहाद्दरपुरा गावाचा फिडर पूर्ववत करून नियमित व अखंड वीजपुरवठा सुरू करावा, नागरी वस्तीतील घरांवरून गेलेल्या जीवघेण्या वीजवाहिन्या तात्काळ हटवाव्यात, ग्रामीण भागावर लादलेले लोडशेडिंग बंद करावे, तसेच वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक साहित्य वेळेवर उपलब्ध करून द्यावे, अशा प्रमुख मागण्या आंदोलकांनी केल्या. याशिवाय, महावितरणने देखभाल व दुरुस्तीसाठी नियुक्त केलेल्या एजन्सींच्या कामकाजाची सखोल चौकशी करावी, अकार्यक्षम उपकार्यकारी अभियंता यांच्यावर विभागीय कारवाई करावी व इतर मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरु करण्यात आले आहे. उपोषणस्थळी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता विश्वनाथ मठपती व सहाय्यक अभियंता मुजीब पठाण यांनी भेट देऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. संबंधित पान ४ वर

# लोकशाहीचा 'बाजार' की, मतदारांचा 'कौल'?

महाराष्ट्राच्या राजकारणाने गेल्या काही वर्षांत जे वळण घेतले आहे, ते पाहून सुज्ञ नागरिकांना प्रश्न पडला आहे की, ''याला नेमके काय म्हणावे?'' यंदा निसर्गाच्या लहरीपणामुळे, 'अल निनो'च्या संकटामुळे महाराष्ट्र आणि देशातील अनेक भागांत मान्सूनचा पाऊस लांबला आहे. हवामान विभाग पावसाचे प्रमाण कमी असण्याचा अंदाज वर्तवत असल्याने बळीराजा चिंतेत आहे. पाऊस नसल्यामुळे शेतकरी राजा पेरणीसाठी चातकासारखी वाट पाहत बसला असताना, राज्याच्या राजकारणात मात्र 'तोडफोडीची पेरणी' मोठ्या प्रमाणावर आणि अत्यंत वेगाने सुरू आहे. निसर्गाचा दुष्काळ एकवेळ सहन होईल, पण महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला पडलेला हा मूल्यांचा दुष्काळ लोकशाहीसाठी अत्यंत घातक ठरणारा आहे.काही दिवसांपूर्वीच शिवसेना (ठाकरे गट) च्या सहा खासदारांनी मतदारसंघाच्या विकासासाठी निधी मिळत नसल्याचे कारण पुढे करत थेट शिंदे गटात प्रवेश केला. हे राजकारण इथेच थांबले नाही, तर मुंबईतील वरळी मतदारसंघाचे विधान परिषद सदस्य आणि ठाकरेंच्या 'किचन कॅबिनेट' मधील खंदे शिलेदार मानले जाणारे सचिन अहिर यांनी थेट विधान परिषद उपसभापती पदासाठी शिंदे गटाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला. ज्या नेत्यांवर पक्षाने, नेतृत्वाने आणि मतदारांनी विश्वास टाकला, त्यांनीच ऐनवेळी अशी कोलांटीउडी मारावी, याने संपूर्ण राजकीय वर्तुळाला आश्चर्याचा मोठा धक्का बसला आहे.यापूर्वी एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचे ४० आमदार फोडून महाविकास आघाडी सरकार पाडले होते. नुसते आमदारच नाही, तर खासदारही पळवून त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंनी स्थापन केलेल्या मूळ पक्षावर आणि चिन्हावर दावा केला. केंद्रीय निवडणूक आयोगानेही मग शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' हे चिन्ह शिंदे गटाला बहाल केले. या प्रचंड धक्क्यानंतर उद्धव ठाकरे यांनी 'मशाल' हे नवीन चिन्ह हाती घेतले आणि अवघ्या काही महिन्यांत संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. त्याचे फलित म्हणून त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी महाविकास आघाडीचे नेतृत्व करत घवघवीत यश मिळवले; तर सत्ताधारी भाजप अवघ्या १४-१५ खासदारांवर येऊन अडकला. मतदारांनी गद्दारीला नाकारले, असाच तो संदेश होता.परंतु, राजकारणाची चक्रे वेगाने फिरली. त्यानंतर लगेचच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री 'लाडकी बहीण' योजनेचा असा काही प्रभाव पडला की ठाकरे गटाचे होत्याचे नव्हते झाले. भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी यांच्या 'महायुती'ला जनतेने प्रचंड बहुमत दिले. महायुतीचे सरकार स्पष्ट बहुमताने सत्तेवर आले. त्यावेळी जनतेला वाटले होते की, आता सत्तास्थापनेचा खेळ संपला असून, पुढील पाच वर्षे तोडफोडीचे हे नाट्य थांबेल आणि विकासाचे राजकारण सुरू होईल. मात्र, सत्तेची भूक एवढ्यावर भागत नसते, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. स्पष्ट बहुमत असतानाही विरोधी पक्षाचे खासदार आणि नेते फोडण्याचे सत्र आजही अव्याहतपणे सुरूच आहे. या सर्व घटनांमुळे ''सत्तेशिवाय शहाणपण नाही'' आणि ''सत्ता असेल तरच विकास'' हाच नियम आता नेत्यांनी पक्का करून घेतला आहे. वास्तविक पाहता, लोकशाहीमध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्ष हे रथाच्या दोन चाकांसारखे असतात. दोघांनाही जनतेने समान अधिकार आणि जबाबदारी दिलेली असते. विरोधक जितके मजबूत, तितकी लोकशाही समृद्ध असते. पण एकंदरीतच महायुतीची मनीषा 'विरोधी पक्षमुक्त महाराष्ट्र' करण्याचे राजकारण करण्याची असेल, तर या राज्यातील आणि देशातील लोकशाही खऱ्या अर्थाने धोक्यात आली आहे, हे आता सर्वसामान्य मतदारांनी वेळीच लक्षात घेण्याची गरज आहे.एका पक्षाच्या चिन्हावर, विशिष्ट विचारसरणीवर आणि मतदारांच्या विश्वासावर निवडून आलेले लोकप्रतिनिधी जर वैयक्तिक स्वार्थासाठी किंवा निधीचे कारण पुढे करून सर्रास दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असतील, तर लोकशाहीतील मतदानाच्या पवित्र मूल्याला काय अर्थ उरतो? मतदारांनी रांगेत उभे राहून दिलेले मत हे नेत्यांच्या वैयक्तिक फायद्याचे साधन बनले आहे का, असा गंभीर विचार करण्याची खऱ्या अर्थाने वेळ आली आहे. नेत्यांना पक्षांतराची सवय लागली आहे कारण त्यांना मतदारांची भीती उरलेली नाही.निसर्गाच्या लहरीपणाशी दोन हात करणारा महाराष्ट्राचा राकट मतदार या राजकीय लहरीपणाला कधी गांभीर्याने घेणार? आता चेंडू पूर्णपणे मतदारांच्या कोर्टात आहे. नेत्यांच्या या सोयीच्या आणि तत्त्वहीन राजकारणाला मतदारांनीच आता 'करारा जवाब' देण्याची वेळ आली आहे. आगामी काळात जेव्हा कधी मतदानाची संधी मिळेल, तेव्हा पक्षांतर करणाऱ्या, जनतेच्या मताचा व्यापार करणाऱ्या आणि लोकशाही खिळखिळी करणाऱ्या प्रवृत्तींना मतपेटीच्या माध्यमातून धडा शिकवणे, हेच आता सुज्ञ मतदारांचे आद्य कर्तव्य ठरते. लोकशाही जिवंत ठेवायची की; लोकप्रतिनिधींचा हा बाजार चालू द्यायचा, हे आता मतदारांनीच काय ते ठरवावे!

# कृषी:महाराष्ट्राच्या समृद्धीचा पाया



**डॉ.राजेंद्र बगाटे**

दरवर्षी १ जुलै हा दिवस महाराष्ट्रात कृषी दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका स्मृतिदिनापुरता मर्यादित नसून महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीचा, शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांचा आणि शेतीच्या सर्वांगीण विकासाचा गौरव करणारा दिवस आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. महाराष्ट्राच्या कृषी विकासात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते. त्यांच्या दूरदृष्टीमुळे शेतीच्या आधुनिकीकरणाला चालना मिळाली, सिंचनाचा विस्तार झाला, कृषी संशोधनाला प्रोत्साहन मिळाले आणि शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण धोरणे राबविण्यात आली. त्यामुळे कृषी दिन हा केवळ एका नेत्याला अभिवादन करण्याचा दिवस नसून शेती आणि शेतकरी यांच्या सन्मानाचा, त्यांच्या योगदानाची जाणीव करून देणारा आणि कृषी क्षेत्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी नव्या संकल्पांचा दिवस आहे.

भारतीय संस्कृतीचा पाया कृषीवर उभा आहे. हजारो वर्षांपासून शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून जीवनपद्धती, संस्कृती आणि अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू राहिली आहे. महाराष्ट्राची ओळखही समृद्ध कृषी परंपरेमुळे निर्माण झाली आहे. विदर्भातील कापूस, मराठवाड्यातील ज्वारी, पश्चिम महाराष्ट्रातील ऊस, कोकणातील आंबा, नाशिकचा द्राक्षबागायती पट्टा, उत्तर महाराष्ट्रातील कांदा, खानदेशातील केळी, सातारा-सांगलीतील हळद आणि विविध भागांतील डाळी, तेलबिया, फळे व भाजीपाला यामुळे महाराष्ट्राने कृषी क्षेत्रात स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. राज्यातील भौगोलिक विविधता आणि हवामानातील बदलांमुळे विविध प्रकारची पिके घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात वैविध्य निर्माण झाले असून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया शेतीने घातला आहे.शेतकरी हा समाजाचा अन्नदाता आहे. तो उन्हाची तमा न बाळगता, पावसाची अनिश्चितता सहन करत, अनेक संकटांना सामोरे जात शेती करतो. त्याच्या कष्टामुळे प्रत्येक घरात अन्न पोहोचते. शेती हा केवळ व्यवसाय नसून निसर्गाशी असलेला जिव्हाळ्याचा संवाद आहे. बी पेरण्यापासून ते पीक घरात आणेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्याला संयम, परिश्रम आणि आशावादाची गरज असते. पाऊस वेळेवर पडेल का, रोगराई येईल का, बाजारभाव मिळेल का, उत्पादन खर्च भरून निघेल का, अशा अनेक प्रश्नांशी तो सतत झुंज देत असतो. तरीही तो निराश न होता पुन्हा नव्या हंगामाची तयारी करतो. म्हणूनच कृषी दिन हा शेतकऱ्यांच्या त्यागाचा आणि जिद्दीचा सन्मान करणारा दिवस आहे.

महाराष्ट्राच्या कृषी विकासामध्ये काळानुरूप मोठे बदल झाले आहेत. पारंपरिक शेतीपासून आधुनिक शेतीकडे वाटचाल करताना नवीन बियाणे, सुधारित अवजारे, ठिबक आणि तुषार सिंचन, यांत्रिकीकरण, कृषी संशोधन, हवामान आधारित सल्ला आणि माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला आहे. आज अनेक शेतकरी मोबाईलच्या माध्यमातून हवामानाचा अंदाज, बाजारभाव, पीक संरक्षण आणि कृषीविषयक मार्गदर्शन मिळवत आहेत. कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था आणि कृषी विज्ञान केंद्रे शेतकऱ्यांपर्यंत नवीन तंत्रज्ञान पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. उत्पादनवाढीसोबत गुणवत्तापूर्ण उत्पादनावर भर दिला जात असून निर्यातक्षम शेतीचा विस्तारही होत आहे.हवामान बदल हे आज कृषी क्षेत्रासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. पावसाचे अनियमित स्वरूप, वाढते तापमान, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट आणि पूर यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. एका बाजूला पाण्याचा तुटवडा तर दुसऱ्या बाजूला अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान अशी दुहेरी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शाश्वत कृषी विकासासाठी हवामानाशी सुसंगत शेती पद्धती स्वीकारणे अत्यावश्यक झाले आहे. जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, पावसाच्या पाण्याचे संधारण, पीक विविधीकरण, मृदसंवर्धन आणि कमी पाण्यात येणाऱ्या पिकांचा अवलंब या उपाययोजना भविष्यातील शेतीसाठी अत्यंत आवश्यक ठरणार आहेत.

पाणी हे शेतीचे प्राण आहे. महाराष्ट्रातील अनेक भाग अजूनही पावसावर अवलंबून आहेत. त्यामुळे प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखून जलव्यवस्थापनाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. जलयुक्त शिवार, शेततळे, बंधारे, नाला खोलीकरण, ठिबक सिंचन आणि तुषार सिंचन यांसारख्या उपायांमुळे पाण्याचा कार्यक्षम वापर शक्य झाला आहे. अनेक गावांनी लोकसहभागातून जलसंधारणाची यशस्वी उदाहरणे निर्माण केली आहेत. पाण्याचे योग्य नियोजन केल्यास उत्पादन वाढते, खर्च कमी होतो आणि दुष्काळाच्या संकटावर मात करता येते.मातीचे आरोग्य जपणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. रासायनिक खतांचा अतिरेक, जमिनीची धूप आणि सेंद्रिय पदार्थांचे कमी होत जाणारे प्रमाण यामुळे जमिनीची सुपीकता घटत आहे. त्यामुळे सेंद्रिय खतांचा वापर, हिरवळीची खते, गांडूळखत, जैवखते आणि संतुलित पोषण व्यवस्थापन यावर भर देणे गरजेचे आहे. मृदा परीक्षण करून आवश्यकतेनुसार खतांचा वापर केल्यास उत्पादनात वाढ होण्याबरोबरच खर्चातही बचत होते. माती ही केवळ उत्पादनाचे साधन नसून पुढील पिढ्यांसाठी जपून ठेवण्याची नैसर्गिक संपत्ती आहे.आजच्या काळात नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती आणि शाश्वत शेती यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्राहकांमध्ये रसायनमुक्त अन्नधान्याची मागणी वाढत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी नैसर्गिक शेतीकडे वळत आहेत. स्थानिक संसाधनांचा वापर, कमी खर्च, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान आणि जमिनीचे आरोग्य जपण्यावर आधारित शेती भविष्यासाठी अधिक उपयुक्त ठरत आहे. अशा शेतीमुळे उत्पादनाचा दर्जा सुधारतो, पर्यावरणाचे संवर्धन होते आणि ग्राहकांनाही सुरक्षित अन्न उपलब्ध होते.

कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाने मोठी क्रांती घडवून आणली आहे. ड्रोनद्वारे पीक निरीक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित रोगनिदान, उपग्रह तंत्रज्ञान, सेन्सर प्रणाली, स्वयंचलित सिंचन, डिजिटल बाजारपेठ आणि ई-व्यापारामुळे शेती अधिक वैज्ञानिक बनत आहे. अचूक शेतीमुळे पाणी, खते आणि कीटकनाशकांचा योग्य वापर करता येतो. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि उत्पादनाची गुणवत्ता वाढते. भविष्यात डिजिटल कृषी ही ग्रामीण विकासाची महत्त्वाची दिशा ठरणार आहे.शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केवळ उत्पादन वाढविणे पुरेसे नाही, तर मूल्यवर्धन आणि बाजारपेठेशी थेट जोडणी आवश्यक आहे. कृषी प्रक्रिया उद्योग, शीतगृहे, साठवणूक सुविधा, निर्यात, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि थेट ग्राहकांना विक्री या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळू शकतो. फळे, भाजीपाला, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधमाशी पालन, रेशीम उद्योग आणि कृषी पर्यटन यांसारखे पूरक व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यास मदत करतात. शेतीला उद्योगाची जोड मिळाल्यास रोजगारनिर्मिती आणि उत्पन्नवाढ दोन्ही शक्य होतात. महिलांचे कृषी क्षेत्रातील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. पेरणी, निंदणी, कापणी, पशुपालन, बीज संवर्धन आणि कृषी प्रक्रिया यामध्ये महिलांचा मोठा सहभाग असतो. अनेक महिला बचतगट कृषीपूरक उद्योग यशस्वीपणे चालवत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी महिलांना प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य, बाजारपेठ आणि आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता वाढविणे आवश्यक आहे. महिला सशक्त झाल्यास कृषी विकासालाही नवी गती मिळते.

युवा पिढीने शेतीकडे आधुनिक व्यवसाय म्हणून पाहण्याची गरज आहे. कृषी पदवीधर, कृषी उद्योजक आणि स्टार्टअपच्या माध्यमातून अनेक तरुण शेतीत नवकल्पना आणत आहेत. स्मार्ट शेती, कृषी सल्लागार सेवा, अ‍ॅग्री-टेक, जैवउत्पादने, प्रक्रिया उद्योग आणि ई-कॉमर्सच्या माध्यमातून शेतीला नवे आयाम मिळत आहेत. शिक्षित तरुणांनी ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती करून कृषी क्षेत्र अधिक स्पर्धात्मक आणि सक्षम बनविण्याची आवश्यकता आहे.कृषी शिक्षण आणि संशोधन हे कृषी विकासाचे आधारस्तंभ आहेत. बदलत्या हवामानानुसार नवीन वाण विकसित करणे, रोगप्रतिबंधक तंत्रज्ञान, कमी खर्चातील शेती, जैवविविधतेचे संवर्धन आणि आधुनिक कृषी व्यवस्थापन यासाठी संशोधन संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. संशोधनातून विकसित होणारे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचले तर कृषी क्षेत्र अधिक सक्षम होईल.आज कृषी क्षेत्रासमोर अनेक समस्या आहेत. उत्पादन खर्च वाढत आहे, बाजारभावात चढ-उतार होत आहेत, नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढले आहे, शेतीचे क्षेत्र लहान होत आहे आणि ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढत आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी दीर्घकालीन कृषी धोरण, शाश्वत जलव्यवस्थापन, पिकांचे योग्य नियोजन, विमा संरक्षण, कृषी प्रक्रिया उद्योग आणि शेतकरी-केंद्रित धोरणे आवश्यक आहेत. शासन, संशोधन संस्था, स्वयंसेवी संघटना आणि शेतकरी यांनी समन्वयाने कार्य केल्यास कृषी क्षेत्र अधिक सक्षम होऊ शकते.


'जय जवान, जय किसान' हा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. देशाची अन्नसुरक्षा, अर्थव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य यांचा पाया शेतीवरच अवलंबून आहे. कृषी हा केवळ अर्थकारणाचा विषय नसून पर्यावरण, संस्कृती, रोजगार, पोषण आणि ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाचा योग्य सन्मान, त्यांच्या उत्पादनाला न्याय्य मोबदला आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यास भारत जगातील अग्रगण्य कृषी राष्ट्र म्हणून अधिक सक्षमपणे उभा राहू शकतो.कृषी दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रमांचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा आणि नव्या संकल्पांचा दिवस आहे. शेतकरी समृद्ध झाला तर गाव समृद्ध होईल, गाव समृद्ध झाले तर राज्य प्रगत होईल आणि राज्य प्रगत झाले तर देशाची प्रगती अधिक वेगाने होईल. म्हणूनच कृषी दिनाच्या निमित्ताने जल, जमीन, जंगल आणि जैवविविधतेचे संवर्धन करत आधुनिक विज्ञान आणि पारंपरिक ज्ञान यांचा समन्वय साधणारी शाश्वत शेती उभारण्याचा निर्धार करणे ही काळाची गरज आहे. शेतकऱ्यांच्या घामाच्या प्रत्येक थेंबाचा सन्मान, कृषी क्षेत्रातील नवसंशोधनाचा स्वीकार आणि निसर्गाशी सुसंगत विकासाचा मार्ग स्वीकारणे, हीच महाराष्ट्राच्या कृषी दिनाची खरी प्रेरणा ठरेल. कृषी हा केवळ व्यवसाय नाही, तर संस्कृती, सभ्यता आणि जीवनाचा आधार आहे. त्यामुळे समृद्ध शेतकरी, समृद्ध महाराष्ट्र आणि समृद्ध भारत हे स्वप्न साकार करण्यासाठी कृषी दिन हा प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणा, कृतज्ञता आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे.

# महाराष्ट्राच्या कृषी विकासाला नवी दिशा-इंडोरामा इंडीया प्रा.लि.ची बाजार पेठेतील प्रवेश कृषी क्षेत्राला नवी ऊर्जा

नांदेड-इंडोरामा इंडीया प्रा. लि. कँपनी द्वारा महाराष्ट्रात कृषी क्षेत्रात प्रथमच सुरुवात केली आहे. इंडोरामा मार्फत प्रथमच कॉम्प्लेक्स १०:२६:२६ या खताचा पुरवठा केला आहे. सध्या महाराष्ट्र मध्ये या खताचा पुरवठा झाल्यामुळे सर्व घटकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

मा. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे मामा यांच्या पाठपुराव्याने व सहकार्याने महाराष्ट्रामध्ये इंडोरामा कँपनीने दमदार सुरुवात केली आहे. यामध्ये कँपनी मार्फत सध्या १०:२६:२६ या ग्रेड चा पुरवठा केला आहे. भविष्यात कँपनीचा सर्व ग्रेड पुरवठा करण्याचा मूख्य हेतू आहे यामध्ये प्रामुख्याने डी.ए.पी १०:२६:२६, १०:२६:२६, २०:२०:००:१३, एम.ओ. पी.अमोनियम सल्फेट, यूरिया, १४:२८:१४, १५:१५:१५, एस. एस. पी. व सुक्ष्म अन्नद्रव्यं याच बरोबर जैविक खते, बियाणे व पीक सरंक्षण (किड, रोग व तन नियंत्रण) यांचा प्रामुख्याने समावेश राहील. या मार्फत कृषी क्षेत्राला आव्यश्यक सर्वच सुविधा शेतकरी वर्गाला एकाच ठिकाणी भेटेल.

सध्या कँपनी मार्फत उत्तर भारतामध्ये व पूर्व भारतात पारस व शक्तिमान या मोठ्या बँडचा विस्तार झालेला आहे. यामध्ये प्रामुख्याने कृषी संबंधी सर्व सुविधा कँपनी मार्फत पुरवल्या जातात. तसाच हेतू भविष्यात कँपनीचा महाराष्ट्रामध्ये असणार आहे. सध्या कँपनीचा भारतामध्ये हल्दीया (प. बंगाल) या ठिकाणी डी ए पी व कॉम्प्लेक्स प्लांट असून जगदीशपूर (उ.प.) या ठिकाणी यूरिया प्लांट उपलब्ध आहे. इंडोरामा कॉर्पोरेशन हा जागतिक ग्रुप आहे. या ग्रुपचे मुख्यतः नायजेरिया, भारत, उजबेकिस्थान व जॉर्जिया या देशात यूरिया उत्पादन आहे. याच बरोबर सेनेगल, भारत उजबेकिस्थान व ब्राझील या देशामध्ये फोस्फेट व कॉम्प्लेक्सचे उत्पादन आहे. याबरोबर नुकतेच कँपनीने चायना मध्ये यूरिया उत्पादन विस्तार व इजीप्त मध्ये डी ए पी चा विस्तार केला आहे. याचा येणाऱ्या दिवसामध्ये मुखतः भारताला फायदा होणार आहे. या ग्रुपचे चेरमन मा. प्रकाश लोहीयाजी आहेत. भारतात मा. राजवीर सिंगजी सी इ ओ आहेत. तसेच मा. दिलीप सिंगजी चीफ मार्केटिंग ऑफिसर आहेत व डॉ यू सी दिक्षित जी चीफ कस्टमर ऑफिसर आहेत.इंडोरामा इंडीया प्रा.लि.ची महाराष्ट्रामध्ये सुरुवात होण्यासाठी मुखतः कृषी विभागाची खूप मदत झाली. नुकतीच नांदेड या जिल्हयामध्ये इंडोरामाची प्रथम रेक व रेक उदघाटन कार्यक्रम संपन्न झाला या वेळी कृषी विभागाचे जिल्हा अधीक्षक




कृषी अधिकारी श्री दत्तकुमार कळसाईत साहेब तसेच कृषी विकास अधिकारी आएतोडे साहेब व मोहीम अधिकारी कपाळे साहेब व जिल्हा गुण नियंत्रक कँट्रोल अधिकारी पेकम साहेब उपस्थित होते. तसेच मामडे कृषी सेवा केंद्रचे मधुकर मामडे तसेच कैलास फर्टीलीझर्स चे सर्वेसर्वा शिवशंकर पुरमवारजी व वसुंधरा फर्टीलीझर चे कुणाल अग्रवालजी व कँपनी प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य हेड विनय मिश्राजी व मराठवाडा व विदर्भ विभागीय व्यवस्थापक दिपक जहाजी उपस्थित होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

## प्रारंभिक अधिसूचना कलम ११

क्र.२०२१/उपजि/लसिका/सिआर-२६
कार्यालय-उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
लसिका नांदेड
दिनांक :- १५/०६/२०२६

### भूमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३

क्रमांक क्र.२०२१/उपजि/लसिका/सिआर-२६ ज्याअर्थी, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसुचना महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण १९/२०१४/प्र.क्र.७७/अ दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात या पुढे जिचा निर्देश उक्त अधिसुचना असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (झेड अे) असे व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या नांदेड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात पुढे जिचा निर्देश उक्त ''सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनूसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसुची तीन मध्ये दिलेली आहेत. आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसुची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, या सोबत जोडलेल्या अनुसुची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी कारणे नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१३ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी यांनी उक्त अधिनयिमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लसिका नांदेड यास पदनिर्देशित केले आहे.

**अनुसूची-एक**
संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन
गाव - मौ.राहेगाव तालुका नांदेड जिल्हा नांदेड

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादीत क्षेत्र हे.आर |
|---|---|---|
| १ | २ | ०.०३ |
| २ | ३ | ०.०३ |
| ३ | ४ | ०.०५२६ |
| ४ | ५ | ०.०८ |
| ५ | ५ | ०.०२ |
| ६ | ६ | ०.०१ |
| ७ | ३२ | ०.१३ |
| ८ | ३२ | ०.०७ |
| ९ | ३३ | ०.२४ |
| १० | ३४ | ०.११ |
| ११ | ३४ | ०.०९ |
| १२ | ३५ | ०.०५ |
| १३ | ३५ | ०.११ |
| १४ | ३६ | ०.४१ |
| १५ | ३७ | ०.०७ |
| १६ | ४२ | ०.०६ |
| १७ | ४३ | ०.०४ |
| १८ | ४४ | ०.०७ |
| १९ | १५१ | ०.०२ |
| २० | १५२ | ०.०२ |
| २१ | १५३ | ०.०५ |
| २२ | १५४ | ०.१२ |
| २३ | १५५ | ०.९९ |
| २४ | १५६ | ०.०९ |
| २५ | १५७ | ०.१३ |
| २६ | १५८ | ०.२४ |
| | **एकुण** | **३.३३२६** |

# नांदेड गुरुद्वारा सुधारणा कायदा स्थगित; महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्पष्टीकरण

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड येथील ऐतिहासिक व पवित्र श्री हजूर अबचलनगर सचखंड गुरुद्वाराच्या प्रशासकीय व्यवस्थेबाबत १९५६ च्या जुन्या कायद्यात प्रस्तावित सुधारणांविषयी शीख समाजात असलेल्या भावना लक्षात घेऊन, राज्य सरकारने हा कायदा तूर्तास स्थगित करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार हा कायदा विधिमंडळात आणणे लांबणीवर टाकण्यात आले असून, आता एका उच्चस्तरीय समितीच्या माध्यमातून शीख समाजाचे मत ऐकून घेतल्यानंतरच पुढील पाऊल उचलले जाईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

विधानभवनातील पत्रकार कक्षात आयोजित पत्रकार परिषदेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली. यावेळी डॉ.विजय सतबीरसिंग यांच्यासह हजूर अबचलनगर सचखंड गुरुद्वाराचे सदस्य उपस्थित होते. महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, नांदेड गुरुद्वाराचे पूर्ण नियंत्रण महाराष्ट्र सरकारकडे जाणार असल्याचा खोटा दावा केला गेला होता. तो पूर्णपणे फेटाळण्यात आला असून, गुरुद्वाराचे संपूर्ण संचालन केवळ शीख समाजाच्या माध्यमातूनच केले जाईल, असे स्पष्ट केले आहे. सरकारचा उद्देश गुरुद्वारावर ताबा मिळवणे नसून, वाढती भाविकांची संख्या लक्षात घेता तेथे जागतिक दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आणि व्यवस्थापन अधिक पारदर्शक करणे हाच आहे.

सध्या लागू असलेला कायदा १९५६ चा म्हणजेच तत्कालीन हैदराबाद सरकारच्या काळातील आहे. बदलत्या परिस्थितीनुसार निवृत्त न्यायमूर्ती श्री. भाटिया समितीने काही सुधारणा सुचवल्या होत्या. प्रस्तावित बदलांनुसार गुरुद्वारा बोर्डाची सदस्य संख्या १७ वरून २१ करण्यात आली आहे. पूर्वी ५ सदस्य निवडून येत होते, आता ही संख्या ६ करण्यात आली आहे. तसेच, अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवड आधी सरकार करणार होते, मात्र आता ती निवडून आलेल्या २१ सदस्यांमधूनच अंतर्गत निवडणूक पद्धतीने केली जाईल. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, या सर्व महसूल विभागांतून प्रत्येकी १ आणि कोकण मुंबईमधून २ प्रतिनिधी घेतले जातील. जेणेकरून संपूर्ण महाराष्ट्रातील शीख समाजाला व्यापक प्रतिनिधित्व मिळेल. ६ सदस्य नांदेडचे स्थानिक असतील. बोर्डात शीख समाजातील निवृत्त आयएएस, आयपीएस अधिकारी, जिल्हाधिकारी, तसेच शीख समाजाचे खासदार आणि आमदार यांचाही समावेश करण्याची तरतूद आहे. एसजीपीसी (अमृतसर) कडून २ सदस्य नामनिर्देशित केले जातील. आता या कायद्यात काय हवे आणि काय नको, याबाबत निर्णय घेण्यासाठी 'अतिरिक्त मुख्य सचिव', आयुक्त आणि 'जिल्हाधिकारी' यांची एक विशेष समिती स्थापन केली जाईल. ही समिती सचखंड समितीशी चर्चा करून, त्यांचे मत आणि शिफारसी ऐकून घेईल. शीख समाजाशी व्यापक चर्चा व सल्लामसलत केल्यानंतरच अंतिम मसुदा तयार केला जाईल.

## उस्माननगर शिवारातील जुगार अड्ड्यावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-मौजे उस्माननगर शिवारातील शेतात सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर मंगळवारी सायंकाळी पोलीसांनी धाड टाकुन जुगार खेळणाऱ्या सहा जणांना अटक करण्यात आली.

उस्माननगर शिवारातील एका शेतात जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली.उस्माननगर पोलीसांनी मंगळवारी सायंकाळी सदरील जुगार अड्ड्यावर धाड टाकली. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना गोविंद बाबा सोनटक्के (वय ३५),सदाशिव नागोराव पाटजळे (वय ५४), संतोष नारायण घोरबांड (वय ३०), बालाजी केरबा कांबळे (वय ५७), अंकुश बालाजी काळम (वय २८), माधव बालाजी भिसे (वय ६६) सर्व रा. उस्माननगर यांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य पोलीसांनी जप्त केले. याप्रकरणी उस्माननगर पोलीस ठाण्यात सहा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गळफास घेवून एका शेतकऱ्याची आत्महत्या

नांदेड/प्रतिनिधी-शेतातील नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून एका शेतकऱ्याने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना माळाकोळी शिवारात मंगळवारी सकाळी घडली आहे.


संग्राम मोतीराम तिडके (वय ५७) रा.माळाकोळी यांनी शेतीसाठी बँकेकडून कर्ज घेतले होते. शेतातील सततच्या नापिकीमुळे बँकेच्या कर्जाची परतफेड करता आली नाही. बँकेचे कर्ज कसे फेडावे या चिंतेतून संग्राम तिडके यांनी शेतातील आखाड्यावर मंगळवारी गळफास घेवून आत्महत्या केली आहे. इंद्रजीत तिडके यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माळाकोळी पोलीस ठाण्यात अकस्मीक मृत्यू म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नांदेड जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येच्या घटना सतत घडत आहेत.



बिलोलीचे पोलीस उपअधीक्षक श्याम पानेगावकर यांच्या आदेशावरुन कार्यालयातील विशेष पथक सोमवारी रात्री कुंटूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत गस्त घालीत असतांना दुचाकीवर जाणाऱ्या एका इसमास ताब्यात घेवून त्याची तपासणी केली असता त्याच्या जवळ देशी दारुचे पाच बॉक्स आढळून आले. पोलीसांनी दारुचे बॉक्स व दुचाकी जप्त केली आहे.

## हरीत क्रांतीचे प्रणेते वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

मांडवी/प्रतिनिधी-महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरीत क्रांतीचे प्रणेते महानायक वसंतरावजी नाईक यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



या अभिवादन कार्यक्रमा प्रसंगी बाबुसींग राठोड नाईक, प्रदीप चव्हाण करभारी,सुनील श्रीमनवर, अरविंद पवार, बादल राठोड, संजय दादूसींग राठोड, चंदन मांडण,प्रबोध राठोड, सुरेश चव्हाण, दिलीप राठोड, भारत राठोड, अमोल राठोड,गजानन दसरवार, संतोष राठोड,अनिल पवार, शुभम राठोड, मोतीलाल राठोड, ओम राठोड, संतोष राठोड, सिद्धू गुरुनुले प्रामुख्याने उपस्थित होते.या कार्यक्रमाला क्रांतीवीर संत सेवालाल महाराज यांचे पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक पत्रकार बांधव आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी वसंतरावजी नाईक यांच्या कृषी क्षेत्रातील आणि महाराष्ट्राच्या विकासातील अमूल्य योगदानाचा गौरव केला.

**अनुसूची - दोन**
सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नावः- भूसंपादन प्रस्ताव आमदुरा उच्च पातळी बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रासाठी मौ.राहेगाव ता.नांदेड जिल्हा नांदेड
प्रकल्प कार्यालयाचे वर्णनः-कार्यकारी अभियंता विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र.२ नांदेड.

**अनुसूची - तीन**
बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे लागु नाही.

**अनुसूची - चार**
(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश लागू नाही.

**अनुसूची - पाच**
नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील
भूधारकाचे विस्थापन होत नसल्यामुळे प्रशासक नियुक्ती लागु नाही

टिपः- उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लसिका नांदेड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- १५/०६/२०२६
ठिकाण :- नांदेड.

स्वाक्षरित/-
**(प्रियांका पवार)**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
लसिका नांदेड

जिमाका/नां/जाहिरात/३५/२०२६/२०२७

# भुतनहिप्परगा येथील देवस्थानची इनामी जमीन विक्रीचा घाट

## सामाजिक न्याय विभागातील गंभीर प्रकार उघड;गावकरी आक्रमक

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील भुतनहिप्परगा येथील श्रीकृष्ण देवस्थानची दोनशे वर्षांपासून ताब्यात असलेली गट नंबर ६ मधील १.४८ हेक्टर जमीन पुजाराने परस्पर अहमदनगर येथील एकाला विक्री केली. तीच जमीन आता सामाजिक न्याय विभाग खरेदी करण्याचा घाट घातल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. या जमीन प्रकरणात आणखी किती जणांचे पाय खोलात आहेत.

देगलूर तालुक्यातील भुतन हिप्परगा येथील देवस्थानची इनामी जमीन परस्पर पुजाऱ्याने नावावर करून ती जमीन अहिल्यानगर येथील ज्ञानेश्वर जगन्नाथ लंके यांना विक्री केली आहे. लंके यांनी इनामी जमीन सातबारावर देखील आपल्या नावे लावली आहे. विशेष बाब म्हणजे इनामी जमिनीबाबत फेरफार अथवा विक्रीच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय करण्याचे अधिकार संबंधितांना नाहीत. सदर जमीन ज्ञानेश्वर जगन्नाथ लंके यांनी सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांच्या माध्यमातून कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमानी योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध भूमिहीन शेतमजूर यांना देण्यासाठी संबंधित विभागाला विक्रीचा घाट घातला आहे. दरम्यान सहाय्यक आयुक्त शिवानंद मीनगिरे यांनी देगलूरच्या तहसीलदार यांना २२ मे रोजी एक पत्र काढून मोका पाहणी अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. तहसीलदारांनी भूतनहिप्परगा येथील येथील गाव महसूल अधिकाऱ्यास ९ जून रोजी एक पत्र काढून जमिनीत सातबारावर ज्ञानेश्वर जगन्नाथ लंके यांच्या नावाची नोंद असल्याचा मोका पाहणी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मीनगिरे यांनी गावकऱ्यांचा विरोध असताना जमिन खरेदी करण्याचा घाट रचला काय? असा देखील प्रश्न उपस्थित होत असून जिल्हाधिकारी यांच्याकडे सोमवारी ग्रामस्थ बळीराम पाटील, तंटामुक्तीचे अध्यक्ष मधुकर भूताळे, दत्तात्रेय भुताळे, दिगंबर जयकर, संजय शिरकर या गावकऱ्यांनी धाव घेऊन फेरफार रद्द करावा व जमिनीची विक्री करण्यात येऊ नये, अशी मागणी केली आहे. देगलूर तालुक्यातील भुतनहिप्परगा येथील प्राचीन श्रीकृष्ण मंदिर (महानुभाव पंथ)या सार्वजनिक देवस्थानाची परंपरागत इनामी जमीन आहे ती २०० वर्षापासून आहे गावकऱ्यांनी मंदिराची धार्मिक विधी व देखरेख करण्यासाठी पुजारी सुनील बिडकर, आंबेडकर, सुरेखा गुरु किशनबुवा बिडकर यांनी परस्पर इनामी जमीन आपल्या नावे करून ती देवस्थानची जमीन अहिल्यानगर येथील ज्ञानेश्वर जगन्नाथ लंके यांना बनावट खरेदी खताद्वारे बेकायदेशीर विक्री केली. आता तीच जमीन लंके हे सामाजिक न्याय विभागाला कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत भूमिहीन शेतमजुरांसाठी सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनलगिरे यांच्यामार्फत विक्रीचा घाट घातला आहे. देगलूर तालुक्यातील भुतनहिप्परगा येथील श्रीकृष्ण (महानुभाव पंथ) देवस्थानची १.४८ हेक्टर जमीन इनामी आहे. ही जमीन पुजाऱ्याने नावावर करून अहमदनगर येथील व्यक्ती परस्पर विक्री केली आहे. आता तीच जमीन सामाजिक न्याय विभागाला विक्रीचा घाट घातला आहे. भाविक भक्तांच्या भावनेचा आदर करून ही जमीन देवस्थानाकडेच ठेवावी गावकरी एक इंच ही जमीन देणार नाहीत आम्ही लढा देण्यासाठी सज्ज आहोत. असा इशारा बळीराम पाटील यांनी दिला आहे.

# महापालिकेच्या वतीने कै.वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



नांदेड/प्रतिनिधी- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके तर्फे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळयास महापौर सौ.कविता संतोष मुळे आणि पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहण्याचा बहुमान कै. वसंतराव नाईक यांच्या नावावर आहे. त्यांना महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे जनक आणि 'पहिले शेतकरी मुख्यमंत्री' म्हणून ओळखले जाते. याप्रसंगी स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंग गाडीवाले, महिला बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, किशोर स्वामी, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपआयुक्त स.अजितपालसिंग संधु,डॉ.मिर्झा फरहतुल्ला बेग, क्षेत्रिय अधिकारी राजेश जाधव यांच्यासह मनपाचे कर्मचारी व शहरातील नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



भाजपचे महानगर उपाध्यक्ष संतोष मुळे यांच्या वाढदिवसानिमित्त अतिरिक्त आयुक्त गिरीष कदम यांनी पुष्पगुच्छ देवून अभिष्टचिंतन केले. यावेळी महापौर सौ.कविता मुळे, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, भालचंद्र पवळे, नागनाथ पतंगे यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित होते.

# मांडवी अपर तहसील कार्यालयाच्या प्रस्तावाला गती

किनवट/प्रतिनिधी-किनवटला जिल्ह्याचा तर मांडवी आणि इस्लापूरला तालुक्याचा दर्जा मिळावा यासाठी मागील तीस वर्षांपेक्षा अधिक काळाचा किनवटकरांचा प्रदीर्घ संघर्षात आ.भीमराव केरामांच्याही अतुलनीय योगदानाची किनार लावल्याने मागण्या पूर्ण होतांना दिसतात. किनवटला अपर जिल्हाधिकारी कार्यालय आणि इस्लापूरला अपर तहसील कार्यालय पदरी पाडून घेतले असून आता मांडवीलाही अपर तहसील कार्यालयाच्या मंजुरीसाठी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंकडे पत्र सुपूर्द केले असून जवळपास मंत्रालय स्तरावर सुद्धा ग्रीन सिग्नल दिल्यामुळे किनवटकरांनी स्वागत केले आहे.

किनवट, इस्लापूर आणि मांडवी सर्व क्षमतेने जवळपास परिपूर्ण असल्याने तसेच १३४ ग्रामपंचायतींपैकी पेसा अंतर्गतच्या कार्यकक्षेतील ९५ ग्रामपंचायती कार्यान्वित आहेत. पेसांतर्गत विकास निधी सुद्धा पुरक प्रमाणावर येतोय. अपर तहसील कार्यालयाला शासकीय पुरक बाबी आहेत. लोकसंख्या, भौगोलिकदृष्ट्या आणि शासनाला विविध मार्गांनी महसूल मिळऊन देण्यात किनवट, इस्लापूर आणि मांडवी परिसरातील महसूली मंडळी अग्रगण्य आहेत. त्यामुळे अपर जिल्हाधिकारी आणि दोन अपर तहसील कार्यालय देण्यात शासनाच्या तिजोरीवर फारसा आर्थिक भुर्दंड पडणार नसल्याची बाजू आ.केरामांनी अगदी मुद्देसूद मांडल्याने मंत्रालय स्तरावर सकारात्मकता स्पष्ट झाल्याचे सांगण्यात आले. आता हदगाव आणि हिमायतनगर तालुके किनवटला जोडण्यासाठी कृतघ्नता व्यक्त केलेल्यांनी किनवट विधानसभा मतदारसंघातील त्यांच्या १,३९,१९६ चाहत्यांच्या बैठका घेऊन त्यांची मते जाणून घ्यावीत. लोकसभा निवडणुकीत उबाठा शिवसैनिक आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी आ. प्रदीप नाईकांसह महाविकास आघाडीच्या ७६,५५७ मतदारांनी आणि दुसऱ्या बाजूने त्यांचे कटर प्रतिस्पर्धी महायुतीतीच्या उमेदवारासाठी आ.केरामांसह ६२,६३९ मतदारांनी तुमच्या ओळखी नसतानाही खांद्यावर घेतले त्याचे उत्तराई म्हणून किनवटच्या प्रगतीचे मारेकरी ठरलात काय असा किनवटकरांचा संतापजनक सवाल आहे.

# भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत माजी आ.जवळगावकर यांचा जिल्हा बँकेसाठी अर्ज दाखल

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर यांनी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या शेवटच्या दिवशी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करतांना भाजपचे पदाधिकारी उपस्थित असल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

गेल्या काही दिवसांपासून माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर काँग्रेसमध्येच राहणार की, दुसऱ्या पक्षात प्रवेश करणार, याबाबत सातत्याने चर्चा सुरू आहे. त्यांनी २६ जून २०२६ रोजी हदगाव शहरातील सुमन गार्डनमध्ये आपली पुढील राजकीय भूमिका जाहीर करण्यासाठी बैठक आयोजित केली होती. मात्र ऐनवेळी ही बैठक अचानक रद्द करण्यात आल्याने त्यांच्या निर्णया बाबतचे गूढ आणखी वाढले. अशातच त्यांनी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करतांना काँग्रेसचे कोणतेही प्रमुख पदाधिकारी उपस्थित नव्हते. भाजप पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत माधवराव पाटील जवळगावकर



यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीबाबत पुन्हा एकदा चर्चांना वेग आला आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत पक्षीय पाठबळ आणि स्थानिक समीकरणांना मोठे महत्त्व असते. त्यामुळे काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वाची भूमिका आणि इतर राजकीय घडामोडी या निवडणुकीतील त्यांच्या यश-अपयशावर परिणाम करू शकतात. माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर यांनी अद्याप आपल्या राजकीय भवितव्या बाबत कोणतेही स्पष्ट संकेत दिलेले नाहीत. त्यांच्या मौनामुळे हदगाव तालुक्यासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले असून, त्यांच्या प्रत्येक हालचालीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. स्थानिक माध्यमांपासूनही काहीसे दूर असून एकेकाळी स्थानिक पत्रकारांशी सुसंवाद ठेवणारे माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर गेल्या काही वर्षांपासून काही ठराविक माध्यमांशी संवाद साधताना दिसत आहेत. स्थानिक पत्रकारांपासून त्यांनी काहीसे अंतर ठेवल्याची चर्चा असून, त्यामुळे त्यांच्या राजकीय भूमिकेबाबतचे 'गूढ' अधिकच वाढत असल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या 'मौना' मुळे आणि मर्यादित माध्यम संपर्कामुळे त्यांच्या पुढील निर्णयाबाबतचे सस्पेन्स अद्याप कायम आहे.


# मराठवाडा रामदासी देवस्थान इनामधारक कृती समितीची स्थापना

नायगाव/प्रतिनिधी-मराठवाड्यातील देवस्थान इनामधारकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर शासन स्तरावर प्रभावी पाठपुरावा करण्याच्या उद्देशाने 'मराठवाडा देवस्थान इनामधारक कृती समिती' स्थापन करण्यात आली. ही बैठक दि. ३० जून रोजी तडवळे (कसबे) येथील श्रीराम मंदिरात समर्थवंशज स.भ.प. बाळासाहेब स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीत समितीच्या अध्यक्षपदी श्री रामचंद्र महाराज गोसावी (रामदासी) यांची, संघटकपदी धनंजय देशमुख राहेरकर यांची, तर सदस्यपदी बंडोपंत कुंटूरकर (रामदासी) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील प्रतिनिधींचा समावेश असलेली ११ सदस्यीय कृती समिती स्थापन करण्यात आली. समितीमार्फत देवस्थान इनामधारकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात लवकरच राज्याचे महसूलमंत्री मा. ना. चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. या बैठकीस डॉ. संजय जहागीरदार, गदाधरबुवा रामदासी, सुधीरबुवा रामदासी, अ‍ॅड. अमोल रामदासी, शामराव रामदासी, शामराव ढोकीकर, श्रीधर रामदासी, अशोकराव हिवराळे यांच्यासह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील सुमारे इनामधारक प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत देवस्थान इनामधारकांच्या हक्कांचे संरक्षण, प्रलंबित महसुली प्रश्नांचा पाठपुरावा आणि शासन दरबारी एकसंघपणे भूमिका मांडण्यासाठी समिती सक्रियपणे कार्य करणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# माजी तहसीलदार उत्तमराव कागणे यांचे निधन

किनवट/प्रतिनिधी-सेवानिवृत्त तहसीलदार उत्तमराव नारायणराव कागणे (रा.गोकुंदा-नारायणनगर) यांचे वयाच्या ६३ व्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी अर्थात ३० जून २०२६ रोजी निधन झाले असून १ जुलै रोजी किनवट येथील कैलास मोक्षधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि नातवंडं



असा परिवार आहे.

१ जुलै रोजी गोकुंदा येथील त्यांच्या निवासस्थानापासून किनवटच्या कैलास मोक्षधाम स्मशानभूमीपर्यंत अंत्ययात्रा काढण्यात आली होती. दरम्यान शोकसभेत काही मान्यवरांनी स्व.उत्तमराव कागणेंच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. उपस्थितांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित केली. पदोन्नतीवर पदोन्नती मिळवत स्व.उत्तमराव कागणे तहसीलदार पदावर पोहोचून त्यांनी सेवेच्या शेवटच्या टप्प्यात किनवट तहसीलचा तहसीलदार म्हणून कार्यभार स्वीकारला आणि येथेच ३० जून २०२१ रोजी सेवानिवृत्त देखील झाल्याचे सांगितले.

# प्राथमिक शिक्षण आणि खासगी शिकवणी वर्गासाठी नवीन कायदे आणणार-दादा भुसे

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील पूर्व-प्राथमिक शिक्षण, खासगी शिकवणी वर्ग, शालेय पायाभूत सुविधा, शिक्षक प्रशिक्षण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी व्यापक धोरणात्मक सुधारणा राबविण्यात येत असून, यासाठी आवश्यक कायदे आणि नियमावली लवकरच विधानमंडळासमोर मांडण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधान परिषदेत दिली. महाराष्ट्र विधान परिषद नियम २६० अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मंत्री भुसे यांनी शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रम, सुधारणा आणि आगामी धोरणांची सविस्तर माहिती दिली.

शालेय शिक्षण मंत्री भुसे म्हणाले की, तीन ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना पूर्व-प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खासगी केंद्रांची नोंदणी शालेय शिक्षण विभागाच्या प्री-स्कूल रजिस्ट्रेशन पोर्टलवर बंधनकारक करण्यात आली आहे. २४ एप्रिल २०२५ च्या शासन परिपत्रकानुसार ही प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत सुमारे १३,८०० पूर्व-प्राथमिक केंद्रांची नोंदणी पूर्ण झाली आहे. यामुळे पालकांना केंद्रांची माहिती सहज उपलब्ध होईल आणि गुणवत्तापूर्ण व सुरक्षित शिक्षणाला चालना मिळेल.

पान १ वरुन

### ज्योतिबा खराटे...

माहिती पोलीसांना मिळाली. त्यानंतर मोठा पोलीस फौजफाटा अंजनखेड येथे दाखल झाला. ज्योतिबा खराटे यांच्या निवासस्थानाला चारही बाजूंनी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. विशेष पोलीस पथकासह क्यूआरटी तैनात करण्यात आली होती. दोन मोठी क्यूआरटी वाहने तसेच मोठ्या संख्येने पोलीस अधिकारी व कर्मचारी गावात तैनात करण्यात आल्याने अंजनखेड गावाला अक्षरशः छावणीचे स्वरूप प्राप्त झाले. पोलिसांच्या या प्रतिबंधात्मक कारवाईमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. मात्र कोणताही अनुचित प्रकार घडू नये, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. या कारवाईबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नांदेड जिल्हा प्रमुख ज्योतिबा खराटे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत ही लोकशाही हक्कांवर गदा असल्याचा आरोप त्यांनी केला.

### विधानपरिषद उपसभापतीपदी...

नावातच सचिन आहे. एक सचिन देशासाठी क्रिकेट खेळून इतिहास घडवून निवृत्त झाला, तर दुसरा सचिन आता नव्या इनिंगसाठी मैदानात उतरला आहे, असे म्हणत त्यांनी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांची उपमा दिली.यावेळी शिंदे यांनी शेरोशायरी सादर करत वातावरण रंगवले.

### महावितरणच्या ढिसाळ कारभाराविरोधात...

मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन दिले. या आंदोलनात अ‍ॅड. मुकेश्वरराव धोंडगे, माधवराव पेठकर, गुरुनाथ पेठकर, उत्तम भांगे, मनोहर पेठकर, सरपंच प्रतिनिधी शंकर खरात, अ‍ॅड. शिवचरण भांगे, व्यंकट पेठकर यांच्यासह बहाद्दरपुरा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# उद्धव ठाकरेंचा ज्योतिबा खराटेंना फोन; 'तुमच्यासारखे शिवसैनिक असतील तर शिवसेनेला धोका नाही'

माहूर/प्रतिनिधी-अंजनखेड गावाजवळ शिवसैनिकांनी खा.श्रीकांत शिंदे यांना काळे झेंडे दाखवून वाहनांचा ताफा अडविण्याचा प्रयत्न केला. या आंदोलनाचे पडसाद थेट मातोश्रीपर्यंत पोहोचले. आंदोलना दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती समोर येताच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांच्याशी व कार्यकर्त्यांशी दूरध्वनीवरून संवाद साधला आहे.

तुम्ही चांगले काम करत आहात. तुमच्यासारखे निष्ठावान शिवसैनिक असल्यामुळे शिवसेनेला कोणताही धोका नाही, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांचे मनोबल वाढविल्याचे सांगितले. तसेच, लवकरच किनवट येथे जाहीर सभा घेण्यासाठी येणार असल्याचेही त्यांनी कार्यकर्त्यांना आश्वासन दिले.या फोननंतर आंदोलनस्थळी उपस्थित शिवसैनिकांमध्ये मोठा उत्साह संचारल्याचे दिसून आले. शिंदे गटाच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या आंदोलनामुळे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये नव्या जोमाचे वातावरण निर्माण झाल्याची प्रतिक्रिया कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात आली.



हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटिंग अ‍ॅण्ड लिथो प्रिंटिंग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४